**<u>४थे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात</u>**

<u>नियमीत दिवाणी दावा क्र २६१/२०१४</u>

*दादासो उत्तम बाबर*

वि.

*हरीदास मारुती बाबर वगैरे*

**<u>आदेश निशाणी क्रमांक ५५ खाली</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मुदत अधिनियम १९६३ च्या कलम ५ अन्वये प्रतिवादी क्र ५ यांचे कायदेशीर प्रतिनीधी दाव्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणकरिता दाखल केला आहे.

२. वादी यांनी असे नमूद केले की, यातील प्रतिवादी क्र ५ अनिल लक्ष्मण देशपांडे हे दिनांक १९.०६.२०२३ रोजी कोंढारपट्टा, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे मयत झाले आहेत. सदरचे अर्जासोबत वादी यांनी प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. वादी यांनी यादी निशाणी क्र ५४ अन्वये प्रतिवादी क्र ५, अनिल लक्ष्मण देशपांडे यांचे मृत्युप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. वादी यांना प्रतिवादी क्र ५ यांचे मृत्युप्रमाणपत्र वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांचा मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता येवू शकले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करावा.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली.

४. वादीच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे वकील यांनी सदरचा दावा हद्दीखुणा कायम होवून मिळणे करीता व निरंतर ताकीदी करीताचा असून प्रतिवादी क्र ५ यांचे वारस प्रकरणात सामील असणे अत्यंत गरजेचे असल्याने त्यांना याकामी सामील करून घेणेत यावे अशी विनंती केली. अर्ज करण्यास जाणूनबुजून वेळ केलेला नाही असे सांगीतले व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. मुदत अधिनियम १९६३ च्या कलम ५ अन्वये असे नमुद केले आहे की, "*आदेश एकवीसच्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाखाली केलेल्या अपिलाहून किंवा अर्जाहून अन्य असे कोणतेही अपील किंवा अर्ज विहित कालावधीनंतर करण्यात आल्यास,*

*अशा कालावधीच्या आत अपील दाखल न करण्यास किंवा अर्ज न करण्यास आपणांस पुरेसे कारण होते अशी जर अपीलकर्त्याने किंवा अर्जदाराने न्यायालयाची खात्री करून दिली तर, ते अपील किंवा तो अर्ज स्वीकारता येईल.(स्पष्टीकरण–विहित कालावधी ठरवताना किंवा मोजताना अपीलकर्त्यांची किंवा अर्जदाराची उच्च न्यायालयाच्या कोणत्याही आदेशामुळे, प्रथेमुळे किंवा न्यायनिर्णयामुळे दिशाभूल झाली हे तथ्य या कलमाच्या अर्थनुसार पुरेसे कारण होवू शकेल.)"*

५. वरील मुदत अधिनियम १९६३ च्या तरतुदींचा विचारात घेता, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र ५ हे दिनांक १९.०६.२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. तेथुन पुढे ९० दिवसात म्हणजेच दिनांक १८.०९.२०२३ पर्यंत वारस प्रतिनिधी अभिलेखावर घेणे जरुरीचे हाते. परंतू वादी यांना प्रतिवादी क्र ५ मयत झाल्याची माहिती नसल्याने. तसेच दिनांक २७.०९.२०२३ रोजी वादीस प्रतिवादी क्र ५ यांच्या मृत्युची माहीती झाल्यामुळे वादीस यांना अर्ज दाखल करण्यास ८ दिवसांचा विलंब झाल्याचे तसेच वादीने प्रस्तुतचा अर्ज दिनांक २७.०९.२०२३ रोजी न्यायालयात दाखल केल्याचे अभिलेखावरून दिसून येते.

६. येथे हे नमुद करणे आवश्यक आहे की, प्रस्तुतचे प्रकरण हे हद्दीखुणा कायम होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठीचा आहे. सबब दावा मिळकतीमध्ये दोन्ही पक्षकारांचे हित जोपासलेले आहेत. मयत प्रतिवादी क्र ५ यांच्या पश्चात त्याचे वारसदार हे प्रतिनीधी असून त्यांच्यावर दाव्यास उत्तर देण्याची जबाबदारी आहे. तसेच वादीच्या वकिलांचा युक्तीवाद विचारात घेता वादी यांनी अर्जात नमूद केलेले विलंब माफीचे कारण हे संयुक्तीक व रास्त वाटते. त्यामुळे दावामिळकती संबंधीचे वाद गुणदोषावर अंतिमतः निकाली काढण्यासाठी मयत प्रतिवादी क्र ५ यांचे वारस प्रतिनिधी अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायोचित ठरेल, म्हणून आदेश.

**आदेश**

१. निशाणी क्र ५५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

MAHESH NARAYAN PATIL Digitally signed by MAHESH NARAYAN PATIL Date: 2023.11.01 17:11:46 +0530

(एम. एन. पाटील)

दिनांक ०१/११/२०२३

४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

माळशिरस

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla (Grade III) |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 01 / 11 / 2023. |
| **Order uploaded on** | **:** | 01 / 11 / 2023. |